पोलीस आयुक्तालय,
नवी मुंबई

# पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल, नवी मुंबई.

''प्रेसनोट'' दि. ११/०७/२०२३

## २०१६ पासुन खुनाच्या गुन्हयातील पाहिजे आरोपीस पनवेल शहर पोलीस ठाणे कडुन उत्तर प्रदेश येथून अटक

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे महेंद्रकुमार चंद्रप्रसाद कौल वय–२६ वर्षे धंदा–नोकरी, चालक, रा. माया कॅन्टीगवाला याची चाळ, वरचा ओवळा, ता.पनवेल जि.रायगड यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे त्यांचा भाउ नामे धर्माप्रसाद चंद्रप्रसाद कोल वय–३२ वर्षे याचे सोबत आरोपी १) जगदीश सिध्दप्रसाद कौल २) नगीना उर्फ चंक्कीपांडे सिध्दी कोल यांनी धुलिवंदनाच्या दिवशी दुपारी झालेल्या किरकोळ भांडणाचे कारणावरून तसेच मयत याचे गावाकडील वडीलोपार्जीत जमीनीचे कारणावरून आरोपीत यांनी आपसात संगणमत करून धर्माप्रसाद चंद्रप्रसाद कोल वय–३२वर्षे यास लाकडी दांडक्याने तसेच कोणत्यातरी जड व कठीण साधनानी मारून मयताचे डोक्यास गंभीर दुखापत करून त्यास जिवे ठार मारले म्हणुन दिलेल्या तक्रारीवरुन पनवेल शहर पोलीस ठाणे येथे ११८/२०१६ भादंवि कलम ३०२,३४ प्रमाणे २५/०३/२०१६ गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, पनवेल व सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पनवेल शहर पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री नितिन ठाकरे, पोलीस निरीक्षक (प्रशा) श्री दिलीप शिंदे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री प्रमोद पवार यांनी गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोउपनि/अभयसिंह शिंदे, पोहवा/२०६८ परेश म्हात्रे, पोना/२७०५ रविंद्र पारधी, पोशि/४२१९ साईनाथ मोकळ असे तपास पथक तयार करण्यात आले होते. नमुद पथकाने गुन्हयातील पाहिजे आरोपी नगीना उर्फ चंक्कीपांडे सिध्दी कोल वय–३४ वर्षे रा. ग्राम सुप्तरवा पो.पिपरा पो. थाना हलीया ता. लालगंज जि.मिर्झापुर राज्य–उत्तर प्रदेश याचे बाबत शोध घेतला असता तो स्वत:चे अस्तीत्व लपवुन मागील ६ ते ७ वर्षापासुन राहत होता. नमुद आरोपीचे कोणत्याही प्रकारचे छायाचित्र अथवा त्याचा मोबाईल क्रमांकाबाबत माहिती उपलब्ध नव्हती. यामुळे नमुद इसमास शोधणे हे अत्यंत आव्हानात्मक व जिकीरिचे काम होते.

पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण विभाग यांनी वाराणसी एस.टी.एफ. पथक अधिकारी पोलीस निरीक्षक अमित श्रीवास्तव व स्थानिक पोलीस यांचेशी योग्य समन्वय साधुन नमुद पाहिजे आरोपीचा अविरत दोन दिवस शोध घेवून ठाव ठिकाणा शोधला असता नमुद पाहिजे आरोपी हा त्याचे पत्नीचे मुळ गावी ग्राम बरया, पो. पिपरा, ता.लालगंज जि.मिर्झापुर येथे राहत असल्याची खात्रीशीर बातमी गोपनिय बातमीदाराकडून प्राप्त झाली. नमुद बातमीच्या अनुषंगाने अतिशय दुर्गम भागात राहत असलेल्या आरोपीची माहिती काढून नमुद पथकाने अतिशय शिताफिने, सापळा रचुन त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करून नमुद आरोपीचा सदर गुन्हयातील सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे नगीना उर्फ चंक्कीपांडे सिध्दी कोल वय–३४ वर्षे रा. ग्राम सुप्तरवा पो.पिपरा पो. थाना हलीया ता. लालगंज जि.मिर्झापुर राज्य–उत्तर प्रदेश यास दिनांक–०७/०७/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, श्री. मिलींद भारंबे, मा. सह. पोलीस आयुक्त श्री संजय मोहिते, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ पनवेल, श्री. पंकज डहाणे, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग श्री. अशोक राजपुत यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे श्री नितिन ठाकरे, पोलीस निरीक्षक (प्रशा) श्री दिलीप शिंदे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री प्रमोद पवार यांनी गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोउपनि/अभयसिंह शिंदे, पोहवा/२०६८ परेश म्हात्रे, पोना/२७०५ रविंद्र पारधी, पोशि/४२१९ साईनाथ मोकळ यांनी केलेली आहे. नमुद आरोपी यास पनवेल शहर पोलीस ठाणे मार्फत मा. प्रथमवर्ग न्यायालय पनवेल येथे हजर करून पुढील कायदेशिर कारवाई करीत आहोत

*****